**<u>प्रेसनोट</u>** दि. १३/०१/२०२३

## जिल्हा उद्योग केंद्र, पुणे येथील उद्योग निरीक्षकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७. |
| तक्रारदार | पुरूष, वय - २६ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक – चंद्रभान परशुराम गोहाड, वय ५७ वर्ष, पद - उद्योग निरीक्षक (वर्ग - ३) जिल्हा उद्योग केंद्र, शिवाजीनगर, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | सुरूवातीस ५००/- रुपये रोख, फोन पे ॲप वरुन १०००/- रुपये व दि. १३/०१/२०२३ रोजी २०००/- रु. (एकुण तीन हजार पाचशे रूपये) |

पडताळणी दिनांक :- दि. ०९/०१/२०२३.
सापळा दिनांक व ठिकाण :- १३/०१/२०२३ रोजी जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, शिवाजीनगर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत खिळे निर्मिती उद्योगाकरीता अर्ज केला होता. सदरचा प्रस्ताव बँकेकडे शिफारशीसह पाठविण्याकरीता लोकसेवक चंद्रभान परशुराम गोहाड यानी ५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक - चंद्रभान परशुराम गोहाड यांनी लाचेची मागणी करून, सुरवातीस ५००/- रुपये, फोन पे ॲप वरुन १०००/- रुपये व आज दिनाक १३/०१/२०२३ रोजी २,०००/- रुपये लाच स्वीकारल्यावर लोकसेवक चंद्रभान गोहाड यांना ताब्यात घेण्यात आले असून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक विरनाथ माने तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे – ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई – ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.

Dy. Supdt. of Police, Anti Corruption & Prohibition Intelligence Bureau, Pune